PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. २१.१२.२०१५

**कृपया प्रसिद्धीसाठी**

# पार्ले महोत्सवसारखे उपक्रम सर्वत्र व्हावेत

राज्यपाल श्री विद्यासागर राव यांचे प्रतिपादन

मुंबई दि. २१: पार्ले महोत्सवसारख्या उपक्रमामुळे लोकांना आनंद मिळतो, तसेच समाजामध्ये एकतेची भावना वाढत असल्यामुळे असे उपक्रम सर्वत्र व्हावेत असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल विद्यासागर राव यांनी केले. विलेपार्ले येथील वामन मंगेश दुभाषी मैदानात संपन्न झालेल्या १६ व्या पार्ले महोत्सवाच्या शानदार उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. हा महोत्सव आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्हावा अशा शुभेच्छासुद्धा त्यांनी दिल्या. १६ व्या पार्ले महोत्सवात ३० हजारपेक्षा जास्त स्पर्धकांचा सहभाग असल्याचा विशेष उल्लेख करुन शिक्षण, सांस्कृतिक व क्रीडा मंत्री विनोदजी तावडे यांनी आयोजनाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासोबत मैदानात खेळावे यासाठी प्रोत्साहन गुण देण्याच्या विचार शासन करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पार्ले महोत्सवात हजारो स्पर्धक येतात याच सोबत इथून ते आपल्या मनात काहीतरी खास साठवून जातात आणि त्यामुळेच ते सतत येत असल्यामुळेच आज पार्ले महोत्सव सर्वांचा “फ्रेंड” झाला आहे असे मनोगत ब्रॅण्ड ॲम्बॅसिडर स्वप्नील जोशी यांनी व्यक्त केले. या प्रसंगी स्वप्नील जोशी, सचित पाटिल यांनी आपल्या आगामी चित्रपटाबाबत उपस्थितांशी संवादही साधला. दरवर्षी प्रमाणे १६व्या पार्ले महोत्सवातही मागील वर्षी पेक्षा अधिक संख्येने स्पर्धक आले असून हा उत्स्फूर्त सहभाग आमची प्रेरणा आहे असे प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांनी सांगितले. असंख्य कार्यकर्त्यांच्या महिनाभराच्या अथक परिश्रमातून महोत्सव घडतो आणि जेव्हा पहिल्या पार्ले महोत्सवातील एक स्पर्धक १६ व्या महोत्सवात परीक्षक म्हणून येतो तेव्हा समाधानाने सर्व थकवा निघून जातो असे त्यांनी आवर्जून सांगितले. या वर्षापासून पार्ले महोत्सवात तसेच संस्थेच्या सर्व कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छाने न करता “पुस्तकाने” केले जाईल असेही त्यांनी जाहीर केले.

सोहळ्यात वर्षा उपाध्याय यांच्या ऱ्हिदमिक जिमनॅस्टिक ग्रुपचे जिमनॅस्टिक या ऑलिंपिकमधील खेळाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या कार्यक्रमास सारस्वत बँकेचे उपाध्यक्ष गौतम ठाकुर, पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे अध्यक्ष अनिल गानू इत्यादि मान्यवर उपस्थित होते. सह आयोजिका नगरसेविका ज्योती अळवणी यांनी आभार मानले तर समीरा गुर्जर जोशी यानी सूत्रसंचालन केले.

------------------------------------------------------------

सदर प्रसिद्धिपत्रक गुरुचरण सिंह संधू यांनी प्रसिद्ध केले आहे.